महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

**क्र. पीआर-३/ नवप्रकाश योजना /३६६१९** **दिनांक :३०.०९.२००८**

## वाणिज्य परिपत्रक क्र. ८९

**विषय :-** वीज पुरवठा कायमस्वरुपी खंडीत करण्यात आलेल्या घरगुती वीज ग्राहकांसाठी नवप्रकाश योजनेला मुदतवाढ देण्याबाबत.

**संदर्भ :-** १) वाणिज्य परिपत्रक क्र. ८३ दिनांक १५.०७.२००८.
२) वाणिज्य परिपत्रक क्र. ८७ दिनांक ३०.०८.२००८.

वरील संदर्भीय विषयास अनुसरुन वाणिज्य परिपत्रक क्र. ८३ दिनांक १५.०७.२००८ अन्वये वीज पुरवठा कायमस्वरुपी खंडीत करण्यात आलेल्या ०.५ के डब्ल्यू जोडभार असलेल्या घरगुती वीज ग्राहकांसाठी दि. १५ जुलै २००८ ते ३० ऑगस्ट २००८ या कालावधीत "नवप्रकाश योजना " राबविण्यात आली होती. तदनंतर सक्षम अधिका-यांच्या मान्यतेनुसार वाणिज्य परिपत्रक क्र. ८७ दिनांक ३०.०८.२००८ अन्वये सदर "नवप्रकाश योजनेची " मुदत दि. ३० सप्टेंबर २००८ पर्यत वाढविण्यात आलेली होती.

वितरण कंपनीच्या काही क्षेत्रिय अधिका-यांनी नवप्रकाश योजनेला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेऊन सदर योजनेला पुन्हा मुदतवाढ मिळावी अशी मागणी सप्टेंबर महिन्याच्या मासिक आढावा बैठकीत केलेली होती. क्षेत्रिय अधिका-यांची सदर सुचना लक्षात घेऊन सक्षम अधिका-यानी सदर "नवप्रकाश योजनेला" दिनांक ३१ ऑक्टोबर २००८ पर्यंत मुदतवाढ देण्याची मंजूरी दिलेली आहे.

सदर योजनेच्या अटी व शर्ती यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नसुन त्या संदर्भीय वाणिज्य परिपत्रक क्र. ८३ दिनांक १५.०७.२००८ प्रमाणे कायम राहतील तथापि, वीजेचा पुर्नपुरवठा न घेणा-या ग्राहकांसाठी सदर योजना लागू राहणार नाही.

सर्व क्षेत्रीय अधिका-यांनी "नवप्रकाश योजनेच्या" मुदतवाढीची नोंद घेवून स्थानिक स्तरावर प्रसिध्दी दयावी व मिळालेल्या प्रतिसादाचा अहवाल या कार्यालयास पाठवावा.

३०/०९

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सविनय सादर :-**
व्यवस्थापकीय संचालक (महावितरण),
संचालक (वित्त), महावितरण,
संचालक (संचलन), महावितरण,
कार्यकारी संचालक - १/२/३ (वि व वा.)

**प्रत माहितीस रवाना :-**
सर्व मुख्य अभियंता, सं व सु परिमंडळ, (महावितरण)
मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)

**प्रत रवाना :-**
सर्व अधिक्षक अभियंता, सं व सु मंडळ, महावितरण,
सर्व कार्यकारी अभियंता, सं व सु विभाग, महावितरण,
सर्व उपविभागीय अभियंता / सहाय्यक अभियंता, सं व सु उपविभाग, महावितरण,